# ‘या लढ्यामध्ये भारत फ्रान्ससोबत’

## ■ पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दहशतवादी हल्ल्याचा केला निषेध ■पैंगबरांच्या व्यंगचित्रामुळे फ्रान्समध्ये पुन्हा तिघांची हत्या

**नवी दिल्ली, दि. २९**

मोहम्मद पैगंबराच्या कार्टूनवरून सुरू झालेल्या वादानं पुन्हा एकदा फ्रान्समध्ये रक्त सांडलं गेलं आहे. काही दिवसांपूर्वी एका शिक्षकाची हत्या करण्यात आल्यानंतर गुरुवारी फ्रान्समधील नीस शहरात एका चर्चमध्ये घुसलेल्या हल्लेखोरांने तिघांचे प्राण घेतले. या हल्ल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला आहे.

मोहम्मद पैगंबरांच्या कार्टूनवरुन सुरु झालेल्या वादातून फ्रान्समधील एका चर्चमध्ये हल्लेखोरानं चाकू हल्ला केला. यामध्ये एका महिलेसह तिघांची हत्या करण्यात आली आहे. ज्या हल्लेखोराने हत्या केली त्याने आधी अल्ला हू अकबरचे नारे दिल्याचं फ्रान्समधील काही माध्यमांनी म्हटलं आहे. फ्रान्समधील नीस शहरात असलेल्या चर्चमध्ये ही घटना घडली. नीस शहराचे महापौर ख्रिश्चियन एस्ट्रोसी यांनी हा हल्ला दहशतवादी हल्ला असल्याचा दावा केलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्याचा निषेध केला. आज नीसमधील चर्चमध्ये झालेल्या भयंकर हल्ल्यासह फ्रान्समध्ये अलीकडे झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचा मी निषेध करतो. आमच्या सहवेदना हल्ल्यात जीव गमावलेल्यांच्या कुटुंबीयांच्या व फ्रान्समधील नागरिकांबरोबर आहेत. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारत फ्रान्ससोबत उभा आहे आहे, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.







### ‘अल्ला हू अकबर’चे नारे देत चाकू हल्ला; तिघांचा मृत्यू

मोहम्मद पैगंबरांच्या कार्टूनवरुन सुरु झालेल्या वादातून फ्रान्सच्या चर्चमध्ये चाकू हल्ला झाला आहे. यामध्ये एका महिलेसह तिघांची हत्या करण्यात आली आहे. ज्या हल्लेखोराने हत्या केली त्याने आधी अल्ला हो अकबरचे नारे दिले. फ्रान्सच्या नीस शहरात असलेल्या चर्चमध्ये ही घटना घडली. हा एक दशतवादी हल्ला असू शकतो असं फ्रान्समधील पोलिसांनी म्हटलं आहे. नीस शहराचे महापौर ख्रिश्चियन एस्ट्रोसी यांनी हा हल्ला दहशतवादी हल्ला असल्याचंच म्हटलं आहे. नीस शहरातल्या नोट्रे डेम चर्चमध्ये हा चाकू हल्ला झाला आहे. हल्लेखोरांना पोलिसांनी अटक केली आहे. आत्तापर्यंत या हल्ल्यात तिघांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये एका महिलेचा समावेश आहे. जिची हत्या गळा चिरुन करण्यात आली आहे. इतर अनेक लोक जखमी आहेत. फ्रान्सच्या एका मंत्र्यानेही महिलेची गळा चिरून हत्या केल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. ज्या हल्लेखोराला पकडण्यात आलं तो सातत्याने अल्ला हू अकबरचे नारे देत होता असंही महापौर ख्रिश्चियन एस्ट्रोसी यांनी सांगितलं. पोलिसांनी हा चाकू हल्ला करणाऱ्यावर गोळ्या झाडल्या आणि त्याला अटकही केली आहे. त्याला हॉस्पिटलमध्ये नेलं जातं आहे, सध्या तो जिवंत आहे.

### फ्रेंच राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांचे भारताकडून समर्थन

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यावर होणाऱ्या व्यक्तीगत टीकेचा भारताने निषेध केला आहे. मॅक्रॉन यांनी इस्लाम आणि कट्टरपंथीय विचारधारेबद्दल, जी भूमिका घेतलीय त्यावरुन त्यांचा मुस्लिम देशांमध्ये निषेध सुरु आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने इमॅन्युएल मॅक्रॉन यांचे समर्थन केले आहे. मॅक्रॉन यांच्यावर होणारी व्यक्तीगत स्वरुपाची टीका हे आंतरराष्ट्रीय मानकांचे उल्लंघन असल्याचे भारताने म्हटले आहे. सार्वजनिक ठिकाणी ज्या क्रूर पद्धतीने फ्रेंच शिक्षकाचा शिरच्छेद करण्यात आला, त्याचाही परराष्ट्र मंत्रालयाने निषेध केला आहे. कुठल्याही परिस्थितीत आणि कुठल्याही कारणासाठी दहशतवादाचे समर्थन करता येणार नाही, असेही भारताने पत्रकात म्हटले आहे. इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी जी भूमिका घेतलीय, त्यावरुन मुस्लिम देशांमध्ये मोठया प्रमाणावर संताप आहे. मॅक्रॉन यांच्याविरोधात निदर्शने सुरु आहेत.

### ‘शार्ली हेब्दो’मध्ये एर्दोगन यांचं व्यंगचित्र

‘शार्ली हेब्दो’ या मासिकाने टर्कीचे अध्यक्ष रिसीप तयिप एर्दोगन यांचे वादग्रस्त व्यंगचित्र प्रकाशित केलं आहे. या व्यंगचित्रामध्ये एर्दोगन हे अंतर्वस्त्रांमध्ये, हातात बिअर घेऊन स्कर्टमधील स्त्रियांकडे पाहताना दाखवण्यात आले आहेत. या व्यंगचित्रामधून मॅक्रॉन यांच्यावर टीका करणारे एर्दोगन हे स्त्री लंपट असल्याचा टोला शार्ली हेब्दोने लगावला आहे. एर्दोगन यांचं असं व्यंगचित्र छापल्याबद्दल टर्कीने संताप व्यक्त केला असून यासंदर्भात कायदेशीर कारवाई करणार असल्याचा इशारा दिला आहे. टर्कीमधील एनटीव्हीने यासंदर्भात अंकाराने (टर्कीची राजधानी) टर्कीमधील फ्रान्स राजदुतावासातील वरिष्ठ अधिकऱ्यांना या व्यंगचित्रासंदर्भात भूमिका स्पष्ट करण्यास सांगितल्याचे म्हटले आहे. एर्दोगन यांनी स्वत: हे वादग्रस्त चित्र पाहिलेलं नाही. आपल्याला अशा अयोग्य मासिकाला जास्त महत्व द्यायचं नसल्याने मी ते पाहिलं नाही असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. मला याबद्दल फारसं काही बोलायचं नाहीय. ज्या हलकट लोकांनी आमच्या प्रिय प्रेषितांचा अपमान केला आहे त्यांच्याबद्दल मी काय बोलणार. माझं चित्र काढून माझ्यावर खासगी स्तरावर जाऊन हल्ला केल्यापेक्षा आपल्याला प्राणाहून प्रिय असणाऱ्या प्रेषितांबद्दल जे झालं त्याचं मला जास्त वाईट वाटत आहे, असं एर्दोगन आपल्या पक्षातील सहकाऱ्यांशी बोलताना म्हणाल्याचे एफपीच्या वृत्तात म्हटलं आहे.

### काय आहे नेमकी घटना?

दोन आठड्यांपूर्वी फ्रान्समधील एका शिक्षकाचा शिरच्छेद केल्याची धक्कादायक घटना समोर आली. विद्यार्थ्यांना प्रेषित महंमद पैगंबर यांची व्यंगचित्रं दाखवून त्या विषयावर चर्चा घडविल्यामुळे पॅरिसमध्ये एका इतिहासाच्या शिक्षकाचा शिरच्छेद करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी १८ वर्षीय चेनेन या संशयित आरोपीस गोळ्या झाडून ठार केलं. यानंतर फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन यांनी या हल्ल्याला इस्लामिक दहशतवाद असं सांगत ‘इस्लाम आपले भविष्य हिरावून घेण्याच्या विचारात आहे मात्र हे कधीच होणार नाही,’ अशी प्रतिक्रिया नोंदवली. यानंतर इस्लामिक देशांनी मॅक्रॉन यांच्या वक्तव्यावर आक्षेप नोंदवला. मागील काही दिवसांमध्ये अनेक इस्लामिक देशांमध्ये फ्रान्स आणि मॅक्रोन यांच्याविरोधात निदर्शने केली जात असल्याचे दिसून येत आहे. दिवसोंदिवस फ्रान्स आणि इस्लामिक देशांमधील वाद वाढत असल्याचे चित्र मागील काही दिवसांपासून दिसत आहे. मॅक्रॉन यांनी महंमद पैगंबरांच्या व्यंगचित्रांवर बंदी घालण्यात येणार नसल्याचेही स्पष्ट केलं आहे.

### टर्कीने केला होता फ्रान्सचा निषेध

टर्कीचे अध्यक्ष रिसीप तयिप एर्दोगन यांनी या प्रकरणासंदर्भात अधिकृत वक्तव्य जारी केलं. मॅक्रॉन यांनी मुस्लीम आणि इस्लामसंदर्भात केलेल्या वक्तव्यांवरुन त्यांना मानसिक उपचाराची गरज असल्याचे दिसून येत असल्याचा टोला एर्दोगन यांनी लगावला. ज्या देशात लाखो मुस्लीम राहतात तेथील प्रमुख नेत्यालाच श्रद्धा आणि स्वातंत्र्याबद्दलच फारशी माहिती नसेल तर याबद्दल आणखीन काय बोलावं?, असंही एर्दोगन यांनी म्हटलं होतं. तसेच त्यांनी फ्रान्समधील वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचंही आवाहन केलं. यावरुनच आता ‘शार्ली हेब्दो’ने एक व्यंगचित्र प्रकाशित केलं असून त्यामुळे टर्कीने याबद्दल आक्षेप नोंदवला आहे.

## मायावती म्हणतात, ‘...भाजपाला मतदान करू’

**लखनौ, दि. २९**

बिहार, मध्यप्रदेश पाठोपाठ उत्तर प्रदेशातील राजकारण चांगलंच तापलं आहे. महत्त्वाचं म्हणजे उत्तर प्रदेशात सध्या विरोधी बाकांवर असलेले दोन्ही पक्षच आमनेसामने आले आहेत. राज्यसभेच्या जागेसाठी बसपा उमेदवारांचा अर्ज रद्द झाला असून, बसपाच्या आमदारांनी अखिलेश यादव यांची भेट घेत बंडखोरीची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे संतापलेल्या मायावतींनी मोठा निर्णय घेतला आहे.

राज्यसभा निवडणुकीत बसपाचे उमेदवार प्रकाश बजाज यांचा उमेदवारी अर्ज बाद झाला. त्यांनी समाजवादी पार्टी रामजी गौतम यांच्याविरूद्ध उमेदवारी दाखल केली होती. बसपा उमेदवारांचा अर्ज रद्द झाल्यानंतर बसपाच्या काही आमदारांनी सपाचे नेते अखिलेश यादव यांची भेट घेतली. या भेटीवर मायावती चांगल्याच संतापल्या. मायावती म्हणाल्या,विधान परिषद निवडणुकीत बसपा जशास तसे उत्तर देण्यासाठी पूर्ण ताकद पणाला लावेल. एकवेळ भाजपाला मत देऊ वा इतर पक्षाला, पण विधान परिषद निवडणुकीत समाजवादी पार्टीच्या उमेदवारांचा पराभव करण्यासाठी सर्वस्व पणाला लावू. आमच्या सात आमदारांना फोडलं गेलं. ही गोष्ट समाजवादी पार्टीला महागात पडेल, असा इशारा मायावती यांनी दिला आहे.

उत्तर प्रदेश विधान परिषदेच्या ११ जागा पुढील वर्षी जानेवारीमध्ये रिक्त होत आहेत. यातील सहा जागांवर समाजवादी पार्टीचे आमदार आहेत. तर दोन आमदार बसपा व तीन आमदार भाजपाचे आहेत. सध्याची स्थिती बघितल्यास या ११ जागापैकी ८ ते ९ जागा भाजपा जिंकण्याची शक्यता आहे. कारण भाजपाची ताकद जास्त आहे. तर एक जागा समाजावादी पार्टी सहज जिंकू शकते. दुसऱ्या जागेवर समाजवादी पार्टीला अपक्ष उमेदवारांसह इतर पक्षांची मदत घेणं आवश्यक असणार आहे.

## सोशल मीडिया’साठी नोटीस?; ‘पोलिसांनो जरा सबुरी दाखवा’

**नवी दिल्ली, दि. २९**

सोशल मिडियावरील पोस्टसाठी देशाच्या एका राज्यातील पोलीस खात्याकडून दुसऱ्या राज्यातील व्यक्तीला नोटीस पाठवण्याचे प्रकार दिवसोंदिवस वाढ असून यासंदर्भात आता थेट सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. अशा प्रकारे पोलीस देशाच्या एका टोकावरुन दुसऱ्या टोकाला राहणाऱ्या व्यक्तीला सोशल मिडियावरील एखाद्या सरकारवर केलेल्या टीकात्मक पोस्टसाठी त्रास देऊ शकत नाही, अशा शब्दांमध्ये न्यायालयाने पोलीस खात्यांना सुनावलं आहे. यासंदर्भातील एका सुनावणीमध्ये न्यायालयाने वेगवेगळ्या राज्यांमधील पोलीस खात्यांची कानउघाडणी केली. बंगाल पोलिसांनी दिल्लीमधील एका व्यक्तीला पाठवलेल्या नोटीशीसंदर्भातील खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे महत्वपूर्ण निरिक्षण नोंदवलं आहे. दिल्लीमधील या व्यक्तीने बंगालमध्ये लॉकडाउनचे नियम योग्य पद्धतीने पाळले गेले नसल्याची टीका करणारी पोस्ट केली होती. संविधानातील कलम १९ (१) (अ) नुसार भारतातील प्रत्येक नागरिकाला मत मांडण्याचा आणि विरोध करण्याचा अधिकार आहे, असं निरिक्षण न्या. डी. व्हाय. चंद्रचूड आणि न्या. इंदिरा बॅनर्जी यांच्या द्विसदस्यीय खंडपीठाने नोंदवलं.

## रशियन लशीची चाचणी पुढील वर्षी

**नवी दिल्ली, दि. २९**

करोनाचा फैलाव रोखण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या दोन स्वदेशी लशींसह भारतात दोन परदेशी लशींच्याही मानवी चाचण्या सुरु आहेत. यात एक आहे ऑक्सफर्ड-अस्त्राझेनेकाची लस तर दुसरी आहे रशियाची ‘स्पुटनिक व्ही’ लस.ऑक्सफर्ड आणि रशियन लशीच्या चाचण्यांचे निष्कर्ष पुढच्यावर्षी येणे अपेक्षित आहे.

भारतात करोनावरील लस उपलब्ध झाल्यानंतर एकही नागरिक लशीपासून वंचित राहणार नाही. सर्वांना लस दिली जाईल असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे. राष्ट्रीय तज्ज्ञ गटाची स्थापना करण्यात आली आहे. हा गट देशभरात लशीचे वितरण सुनिश्चित करेल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

भारतात डॉ. रेड्डी लॅबरोटरीज रशियन स्पुटनिक व्ही लशीच्या चाचण्या करणार आहे. मार्च २०२१ पर्यंत या चाचण्या पूर्ण होऊ शकतात. पुढच्या काही आठवडयात स्पुटनिक व्ही लशीच्या चाचणीसाठी स्वयंसेवकांची नोंदणी सुरु होईल. डिसेंबर अखेरपर्यंत या चाचण्या पूर्ण होतील असे डॉ. रेड्डी लॅबच्या सीईओने म्हटल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे. फेज तीनच्या चाचण्या लवकरात लवकर म्हणजे मार्च अखेरपर्यंत संपू शकतात. एप्रिल-मे पर्यंतही या चाचण्या चालू शकतात असे डॉ. रेड्डी लॅबच्या सीईओचे म्हणणे आहे. फेज दोनच्या चाचण्यांचा निष्कर्ष आणि यंत्रणेकडून पुढील परवानगी मिळण्यावर फेज तीन अवलंबून आहे. सिरम इन्स्टिट्यूटकडून ऑक्सफर्डच्या लशीच्या चाचण्या सुरु आहेत. या चाचण्या जानेवारी पर्यंत संपू शकतात असे सीईओ अदर पूनावाला यांनी सांगितले. आतापर्यंत एक हजारपेक्षा जास्त लोकांना लशीचा पहिला डोस दिला आहे. भारतात एकूण १६०० लोकांवर ऑक्सफर्डच्या लशीची चाचणी होणार आहे. आम्ही दुसरा डोस देऊ, त्यानंतर लशीची सुरक्षितता आणि परिणामकारकता तपासू असे अदर पूनावाला म्हणाले.

## ‘एल ॲण्ड टी’ करणार मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन

**मुंबई, दि. २९**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असलेल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाच्या गुजरातमधील कामाचं कंत्राट लार्सन ॲण्ड टुब्रोला मिळालं आहे. महाराष्ट्र आणि गुजरात अशा दोन राज्यांना हा प्रकल्प जोडणार असून, गुजरातमधील कामाची ऑर्डर एल ॲण्ड टी या कंपनीला मिळाली आहे. कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या हवाल्यानं पीटीआयनं हे वृत्त दिलं आहे.



देशातील पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या गुजरातमधील कामाचं कंत्राट मिळवण्यात लार्सन ॲण्ड टुब्रो ही कंपनी यशस्वी ठरली आहे. गेल्या महिन्यात नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडनं (एनएचएसआरसीएल) १.०८ लाख कोटी कामाची निविदा खुली केली. ५०८ किमी लांबीच्या या कामासाठी आठ कंपन्या बोली लावण्यासाठी पात्र ठरल्या होत्या.

या आगामी बुलेट ट्रेनमुळे दोन शहरांतील अंतर दोन तासात गाठता येणार आहे. या निविदेमध्ये गुजरातमधील वापी ते वडोदरा या दरम्यानच्या एकूण आखणीच्या ४७ टक्के कामाचा समावेश आहे. यात चार रेल्वे स्थानके असणार आहेत. वापी, सुरत, भरूच आणि बिल्लीमोरा अशी त्यांची नावं आहेत. त्याचबरोबर २४ नद्या, ३० महामार्ग क्रॉसिंग असणार आहे.

कंत्राट मिळल्याची माहिती एल ॲण्ड टी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रमण्यम यांनी पीटीआयशी बोलताना दिली. एल ॲण्ड टीच्या इतिहासाप्रमाणेच कंपनी ही बोली जिंकण्यात यशस्वी ठरली आहे. कंपनीनं केंद्राचं मोठं आणि प्रतिष्ठित कंत्राट जिंकलं आहे. चार वर्षात हे काम पूर्ण करण्याचं बंधन असून, दिलेल्या वेळेत काम पूर्ण करण्याबद्दल एल ॲण्ड टीला विश्वास आहे, असं सुब्रमण्यम म्हणाले.

## लष्करासाठी आता विशेष चॅट ॲप

**नवी दिल्ली, दि. २९**

परस्परांशी चॅट करण्यासाठी लष्करी अधिकाऱ्यांना आता अन्य बाहेरच्या मोबाइल ॲप्लिकेशनवर अवलंबून राहण्याची गरज नाही. लष्कराने स्वत:च सुरक्षित मोबाइल ॲप्लिकेशन विकसित केलं आहे. त्यावरुन ते परस्परांशी चॅट करु शकतात. आत्मनिर्भर भारत अभियानातंर्गत भारतीय लष्कराने सोपं आणि सुरक्षित मेसेजिग ॲप्लिकेशन विकसित केलं आहे. त्याला ‘सेक्युर ॲप्लिकेशन फॉर इंटरनेट’ (साई) असे नाव दिल्याचे लष्कराकडून गुरुवारी सांगण्यात आले. व्हॉटसअॅप, टेलिग्राम, जीआयएमएस सारख्या व्यावसायिक मेसेजिंग ॲप्लिकेशन सारखेच हे मोबाइल ॲप्लिकेशन आहे.

अॅड्रॉइड प्लॅटफॉर्मवरुन इंटरनेटद्वारे टेक्सट आणि व्हिडीओ कॉलिंग करता येईल. इन हाऊस सर्व्हरसह कोडिंगची सुरक्षेचे सर्व फिचर या साई ॲपमध्ये आहेत असे लष्कराकडून सांगण्यात आले.


**PHOENIX TOWNSHIP LIMITED**
CIN-L67190GA1993PLC001327
Regd Off: Durga Bhavan, Hede Centre, Tonca, Panaji- 403001. Goa
Corp Office: Balaji Bhavan, 2nd Floor, 14 Best Marg, Colaba, Mumbai- 400001.
Authorised Capital: 28,00,00,000 Paid-up Capital: 21,68,086,80

**STATEMENT OF UN-AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & HALF YEAR ENDED 30.09.2020**

(Rs. In Lacs)

| Particulars | 3 months ended 30.09.2020 (Un-Audited) | 6 months ended 30.09.2020 (Un-Audited) | Previous Year Ended 31.03.2020 (Audited) |
|---|---|---|---|
| Total Income from Operations(Net) | 23.79 | 78.91 | 2001.91 |
| Net Profit/Loss from ordinary Activities after Tax | -175.02 | -283.98 | 37.54 |
| Net Profit/Loss for the period after Tax (after extraordinary items) | -175.02 | -283.98 | 40.15 |
| Equity Share capital | 1398.43 | 1398.43 | 1398.43 |
| Reserve (Excluding Revaluation reserve as shown in the Balance Sheet of Previous Year) | (176.83) | 85.92 | 341.88 |
| Earnings Per Share( before Extraordinary items) | -1.25 | -2.03 | 0.27 |
| Earnings Per Share( after Extraordinary items) | -1.25 | -2.03 | 0.27 |

**Note:** The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/ Annual Financial Results are available on the Stock Exchange websites. (https://www.bseindia.com)

For Phoenix Township Limited
Sd/-
Samit Hede
Managing Director
DIN: 01411689

Place: Mumbai
Date: 29th October, 2020